## मुद्दा क्रमांक ३

## निर्णय प्रक्रियेसाठी अनुसरली जाणारी पद्धत , पर्यवेक्षण आणि जबाबदारी

ब क्षेत्रीय कार्यालय पाणीपुरवठा विभागात आस्थापना विषयक व पाणीपुरवठा विषयक कामकाज चालते. आस्थापना विषयक कामाकाजाशी संबंधित लिपीकाकडे संदर्भ प्राप्त झालेनतंर कार्यवाही करुन नस्ती मुख्य लिपीक , प्रशासन अधिकारी व मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडे सादर केली जाते.व त्यावर निर्णय घेण्यात येवुन विहीत केलेल्या कालमर्यादेत कार्यवाही केली जाते.त्याचप्रमाणे पाणीपुरवठा विषयक कामकाजाशी संबंधित मिटर निरीक्षक व कनिष्ठ अभियंता यांचेकडे संदर्भ प्राप्त झालेनतंर कार्यवाही करुन नस्ती उपअभियंता , मा.कार्यकारी अभियंता व मा.सह शहर अभियंता यांचेकडे सादर केली जाते.व त्यावर निर्णय घेण्यात येवुन विहीत केलेल्या कालमर्यादेत कार्यवाही केली जाते.